महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/89/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 07/03/2025

---

# "मिशन सहयोग"

## (कम्युनिटी पोलीसिंगसाठी नांदेड पोलीसांचा पुढाकार)

पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबध असतो. पोलीसांच्या कामकाज पध्दतीचा परिणाम समाजावर पडत असतो पोलीस प्रशासन 24X7 समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून या बाबतीत पोलीस प्रशासन युवक–युवती, महिला, वृध्द, यांना सोबत घेवून विधायक कार्य करणार आहेत "मिशन सहयोग" अंतर्गत खालील 08 नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरूवात करण्यात येणार आहे.

### 1. ऑपरेशन बीट कनेक्ट :–

जिल्हयातील प्रत्येक गावाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल तसेच शहरातील मोहल्ला कमिटी यांचे मध्ये संवाद योजना त्याच बरोबर पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्या मध्ये क्रिकेट व व्हॉलीबॉल मॅचेसचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा दलांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. यासोबतच बीट इन्चार्ज हे बीट स्तरावर जास्तीत जास्त पोलीस आणि जनतेचा सहभाग वाढवण्यावर भर देतील.

### 2. मिशन उडान

#### अ) रोजगार मेळावा :–

जिल्हयातील बेरोजगार युवक व युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस दलाकडून प्रयत्न करून काही नामांकित कंपन्यांना निमंत्रण देवून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

#### ब) एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. मार्गदर्शन :–

मराठवाडयातील युवक युवतींचे एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. मध्ये प्रमाण वाढवण्यासाठी यशस्वी अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

#### क) ऑयडॉल भेट व मार्गदर्शन :–

शहरातील उपेक्षित, वंचित घटकातील व मोहल्यातील युवकांमध्ये करिअर बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रत्येक कॉलनी व मोहल्ला स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन व आदर्श व्यक्तिमत्वांची (ऑयडॉल) भेट व मार्गदर्शन.

### 3. ऑपरेशन वारसा जतन :–

नांदेड जिल्हयातील नंदगिरी किल्ला, कंधार किल्ला, येरगी, होट्टल या सारख्या प्राचीन ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन करण्यासाठी पोलीस दल प्रयत्नशिल राहणार आहे. त्यात समाजातील युवक युवती तसेच अनेक संस्थांचा सहभाग घेतला जाईल. ज्यामुळे तरूण युवक–युवती सकारात्मक दिशेने जास्तीत जास्त सहभागी व व्यस्त राहतील आणि police -youth engagement वाढेल.

4) नांदेड पोलीस लीग (NPL) :—

नांदेड पोलीस दलाच्या वतीने ग्रामीण भागातील युवकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि police -youth engagement साठी क्रिकेट, कबड्डी स्पर्धेचे आयोजन तीन स्तरावर 1. पोलीस स्टेशन स्तरावर, त्यानंतर 2. उप विभागीय कार्यालय स्तरावर आणि शेवटी 3. पोलीस अधीक्षक कार्यालय स्तरावर अश्या स्वरूपात करण्यात येवून विजेत्यांच्या योग्य सन्मान करण्यात येईल त्यामुळे युवकांच्या उत्साहाला चालना मिळू शकते.

5. मिशन निर्भया :—

समाजात महिलांनी निर्भीडपणे वावरण्यासाठी निर्भया रॅलीचे आयोजन करण्यात येईल यामध्ये युवती व स्त्रियांचा समावेश असेल त्यानंतर परिसंवाद असेल.

6. मिशन समाधान :—

समाजातील जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी आणि (Quick Grievance Redressal) जलद तक्रार निवारण साठी QR कोड आधारीत आणि whatsapp chatbot आधारीत तक्रार निवारण यंत्रणा राबविण्यात येणार आहे.

7. मिशन निर्धार :—

सराईत गुन्हेगार व रेकॉर्डवरील आरोपी यांना व्यसनाधिनता व गुन्हेगारीपासून परावृत्त करणे आणि त्यांना आयुष्यात पुन्हा नव्याने सन्मानाने जगण्यासाठी स्वतःच्या पायावर उभे राहुन आत्मनिर्भर होण्यासाठी मिशन निर्धारचे आयोजन केले जाणारे आहे. यामध्ये skill training, legal counselling, socio-psychological counselling असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

8. मिशन एकता :—

पोलीस दल व समाजातील विविध घटक जसे की पत्रकार, उदयोजक, वकील, डॉक्टर, व्यापारी, ॲटोरिक्षा संघटना, बिल्डर, हॉटेल व्यवसाईक, खाजगी शिकवणी (टयुशन) क्लासेस, यांच्यात समन्वय व एकता निर्माण होण्यासाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. याव्दारे असे विविध सामाजिक घटक व पोलीस दल यांच्यात समन्वय साधून ते आपल्या अडीअडचणी पोलीस दलासमोर मांडू शकतील व शहराच्या विकासामध्ये कश्या पदधतीने योगदान देवू शकतो या अनुषंगाने मिशन एकता राबवले जाणार आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड